# “नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास”

दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

**कार्यालय फोन** : २३८७७३०१, २३८८००७३

**WEB SITE** : **http://www.nkgsbsangh.org**

**E-MAIL** : **nkgsbs@gmail.com**

**कार्यालयीन वेळ** : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

**।। अल्पविद्या महगर्वी ।।**

मूल्य रु. ५

| क्रमांक २ | वर्ष : ४५ | जुलै–सप्टेम्बर २०२३ |
|---|---|---|


**BOOK PACKET**

Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80


**TO,**

**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

## महिलांचा स्नेह मेळावा : भगिनींस निमंत्रण

नेहमीचा श्रावणातला महिलांचा स्नेह मेळावा समारंभ यंदा जोगेश्वरी व मुलुंड येथे योजिला आहे. आपण हेच निमंत्रण समजून वेळात वेळ काढून आपल्या लेकी सुनांसह सोयीस्कर ठिकाणी अवश्य उपस्थित राहावे.

**जोगेश्वरी**

तारीख : शुक्रवार, ८ सप्टेंबर २०२३

स्थळ : रामेश्वर मंदिर सभागृह, सरस्वती बाग, जोगेश्वरी(पूर्व)

वेळ : संध्याकाळी ५ ते ७।।

संघ कार्यकारीणी तर्फे

**शुभदा कसबेकर** ९१६७२०२३६५ **शांता पालेकर** ८८५००६६३८३

**मुलुंड**

तारीख : शुक्रवार, १ सप्टेंबर २०२३

स्थळ : स्मिता उदय वाघ यांचे निवासस्थान, सी ११०३, वीणा अनुथम, ९० फीट रोड, मराठा मंदीर हॉल समोर, केळकर कॉलेज जवळ, मुलुंड (पूर्व)

वेळ : संध्याकाळी ४ ते ७ **ठाणे मंच कार्यकारिणी तर्फे**

**सुरेखा पालेकर** २०८२६६२०१९ **स्मिता वाघ** ९८६७६०३५११

## विवाहाचे सुवर्ण वर्ष गाठणाऱ्या जोडप्यांचा व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींचा संघातर्फे सत्कार

नेहमीच्या प्रथेनुसार यंदाही १९ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या ज्ञातीच्या स्नेहसंमेलनात २०२३ ह्या वर्षात विवाहाचे सुवर्ण वर्ष गाठणाऱ्या जोडप्यांना व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींना ज्ञातीतर्फे स्मृतिचिन्हे देऊन त्यांचा सत्कार करण्यात येईल. संबंधित व्यक्तींनी किंवा त्यांच्या आप्तेष्टांनी त्यांची संपूर्ण नावे, पत्ता व टेलीफोन नंबर ३० सप्टेंबर २०२३ पर्यंत संघाच्या पत्त्यावर पाठवून किंवा टेलीफोनवर कळवून आम्हांला उपकृत करावे.

१ ऑक्टोबर नंतर अशी नावे आल्यास ऐनवेळी ही स्मृतिचिन्हे तयार करणे कठीण जाते याची दखल घ्यावी.

ठाणे मंच आज २६ वर्षे प्रथम वधुवर मंडळ आणि नंतर Online Matrimony Website (www.nkgsbmatrimony.com) सुरू करून सारस्वत समाजाची अविरत सेवा करत आहे.काही तांत्रिक अडचणीमुळे आम्हाला २० एप्रिल २०२३ पासून website तात्पुरती बंद करावी लागली. ह्या संधीचा फायदा घेऊन आम्ही पोर्टलमध्ये थोडा बदल करणार आहोत ज्यायोगे अधिक सक्षम User friendly website उपलब्ध होईल. आपणास झालेल्या गैरसोयीबद्दल आम्ही दिलगिरी व्यक्त करतो.

पुढील ३–४ महिन्यात आम्ही सक्रिय होऊ अशी अपेक्षा आहे. ज्ञातीतील विवाहोत्सुक व्यक्तींनी ह्याचा लाभ घ्यावा.आपल्या सर्वांचा पाठिंबा आणि सहकार्य मिळेल ह्याबद्दल खात्री आहे.

**सुरेश पालेकर** ८९२८८५०१९३ **गिरीष रेगे** ९९२२९६८७२५

## संपादकीय

**आपल्या ज्ञातीतील लहान थोर सर्व बांधवांना पुनश्च**
**ह्या प्रसाद मोहन कसबेकरांचा मनापासून नमस्कार.**

हे संपादकपद मला पुढे सांभाळता यावे या नात्याने माझे गुरु श्री. दत्तात्रय नागेश नाडकर्णी यांनी मला आपल्या हाताने धरून, बाजूला बसवून शिकविण्याचा प्रयत्न केला. ती त्यांची मुखपत्रिकेबाबतची तळमळ मी माझ्या अंतर्मनाने स्वीकारली व मुखपत्रिकेचे किंबहुना त्यांच्या विश्वासाचे सोने करावयास निघालोय खरा, पण ह्या प्रवासात सोने राहिले बाजूला, माझे पितळ उघडे पडू नये एवढीच प्रार्थना!

तळपत्या सूर्यापुढे माझी मिणमिणती पणती कसले ते दिवे लावणार? असो! आज जगाची ज्या प्रकारे नित्य नवनवीन तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात उत्तरोत्तर जी भव्य प्रगती होत आहे ती पाहता डोळे दिपून जातात. पण एक मात्र खरे की या प्रगतीत आपल्या ज्ञातीतील बरेच तरूण व तरुणी सुद्धा, मग त्या भारतात असतील वा विदेशात, त्यांचा ही वाटा आहे हे कौतुकास्पद! एका दोघांची कुणाची मी नावे घेत नाही पण ज्ञातीतील असंख्य तरूण ह्या मार्गामध्ये प्रगती करीत आहेत ती त्यांनी अशीच जोमाने श्री मंगेशाच्या व श्री शांताईच्या कृपेने करावी हीच सदिच्छा.

आपण बरेचदा म्हणतो की, नवीन पिढीला पारंपरिक रीति रिवाजाचा गंध नाही वा त्यातील काहींना ते पटत नाही किंवा काही तरुण बळजबरीने आई वडिलांना वाईट वाटू नये म्हणून करतात. अशा बाबतीत आपण आपल्या रीती रिवाजांचे महत्त्व, त्याची कारणमीमांसा समजावायला कमी पडतो का हे आधी तपासून पहावे. आपण लहान असताना निमुटपणे आईवडिल सांगतील तसे करायचो. ''असे का?'' असे विचारल्यास कित्येकदा कान पिळला जायचा. किंवा ''गधड्या, निमुटपणे सांगतो तसे कर'' हे उत्तर मिळायचे. मग त्या काळातल्या मुलांनी ''कारण'' विचारणेच बंद केले. पण ह्याचे गुपित ठाऊक आहे? – कारण कित्येकदा त्या आईबाबानाच आपण असे का करतो ते माहित नसायचे. परंपरेने चालत आले आहे ना – तसे चालवायचे!

मला एकदा एका विदेशी गृहस्थाने विचारले, ''काहो, तुमचा मुलगा हे प्रश्न कधी विचारतो का जसे १) आई, साखर गोड का असते? २) बाबा, आकाश निळसर का दिसते?'' ह्यांचे कारण त्यांची म्हणजे त्या मुलांची जिज्ञासा वा विचार करण्याची क्षमताच आपण आई बाबांनी मारून टाकलेली असते. जोपर्यंत मुलांच्या मध्ये स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमताच कुणी पेरून देत नसतील तर ती तरूण पिढी पुढे येईल कशी?

पण आज जग बदलले आहे व याचा मला मनापासून गर्व आहे. आपण योग्य त्या प्रथा, योग्य ते पारंपरिक आचार विचार चालूच ठेवले पाहिजेत. पण त्याचवेळी नवीन पिढीला नवीन तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात वावरायला जास्तीत जास्त स्वातंत्र दिले पाहिजे व हे सर्व आपल्या ज्ञातीतील सूज्ञ पालक करीत आहेत याचा मला अभिमान आहे.

आतापुरते इतकेच.

यावर तुमच्या प्रतिक्रिया पाठवल्यास पुढील अंकी प्रसिद्ध करू हे निश्चित!

तुमचा
**प्रसाद (पंकज) मोहन कसबेकर**



**मुखपत्रिकेचे सर्वेसर्वा श्री. दत्तात्रय नागेश नाडकर्णी यांनी ४५ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेमधून निवृत्ति घेतल्याबद्दल प्रेमपूर्वक निरोपाच्या प्रतिक्रिया स्वयंस्फूर्तीने अनेकांनी त्यांच्या पुढील लिखाणातून व्यक्त केल्या आहेत.**

शक्यतो आम्ही सर्वांच्या प्रतिक्रिया देण्याचा मन:पूर्वक प्रयत्न केला आहे. परंतु मुखपत्रिकेच्या जागेअभावी काही थोडीफार वाक्ये (जी पुन्हा पुन्हा सर्वांची आली आहेत.) छाटावी लागली त्याबद्दल अत्यंत दिलगीर आहोत.

आपला,
संपादक

## Tribute to Shri D. N. Nadkarni

सन १९०० च्या सुमारास कारवार सोडून अनेक कुटुंबे मुंबईमध्ये स्थलांतरित झाली. या सर्व कुटुंबांची कारवारशी नाळ टिकून रहावी, जुने संबंध जुळावेत, सर्वांची शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक प्रगती व्हावी या हेतूने आपल्या समाजाच्या तीन संस्था The NKGSB Education Society (स्थापना १९०४), The NKGSB Co-op Bank (स्थापना १९१७), आणि The NKGSB Sangh (स्थापना १९३५) उभारण्यात आल्या आणि नावारूपास आल्या.

The NKGSB संघाच्या स्थापनेनंतर दळणवळणाच्या आणि माहितीच्या आदानप्रदानांच्या अडचणीमुळे आपल्या ज्ञातीबांधवांकरिता त्रैमासिक काढावे हा प्रस्ताव पुढे आला आणि ''शारदा'' हे त्रैमासिक १९३७ ते १९४६ या कालावधीत प्रकाशित होत होते. काही अपरिहार्य कारणामुळे याचे प्रकाशन बंद झाले आणि १९७८ नंतर संघाच्या कार्यकारिणीने श्री. दत्तात्रय नागेश नाडकर्णी यांची संपादक म्हणून नियुक्ती करून ऑगस्ट १९७८ मध्ये मुखपत्रिकेचा पहिला अंक प्रकाशित झाला.
ऑगस्ट १९७८ ते मार्च २०२३ या पूर्ण कालावधीत आपले सर्वांचे DN यांनी आपल्या सक्षम खांद्यावर हा भार पेलला याचे कौतुक करावे तितके कमीच. या मुखपत्रिकेच्या प्रकाशनामुळे आपल्या सर्व ज्ञातिबांधवांना ज्ञातीतील घडामोडींचा एक झळझुळत्या झऱ्याचा सहवास घेता आला याचे सर्व श्रेय DN यांनाच जाते.

त्यांची विद्वत्ता, आपल्या ज्ञातीबांधवांच्या उन्नतीची कळकळ आणि सर्व सामाजिक कार्यात त्यांचा सहवास आणि मार्गदर्शन याबद्दल त्यांना The NKGSB Edu सोसायटी तर्फे त्रिवार प्रणाम.

त्यांचे उर्वरित आयुष्य सुखसमाधानकारक जाओ ही प्रार्थना.

**देवदास नाडकर्णी**
चेअरमन.
The NKGSB Edu Society.

## आपले D.N. Nadkarni

आपल्या मुखपत्रिकेचे संपादक श्री. D.N. नाडकर्णी यांनी ४५ वर्षांच्या अविरत सेवेनंतर प्रकृती अस्वास्थ्यामुळे पूर्ण विराम घ्यायचे ठरविले आहे. मुखपत्रिका म्हणजे DN हे समीकरणच झाले होते. त्यांच्या या अविरत सेवेबद्दल त्यांना सलाम.

DN हे आपल्या ज्ञातीचे Encyclopedia च आहेत. आपल्या ज्ञातीतील अत्यंत गरजू लोकांना आर्थिक मदत करणे हा त्यांचा स्वभाव धर्मच आहे.

त्यांचा अजून एक व्यासंग म्हणजे आपल्या ज्ञातीतील कुटुंबांची Family Tree तयार करणे. यासाठी प्रत्येक कुटुंबाचे नातेसंबंध शोधून मूळ पुरुषापर्यंत माहिती मिळवणे हे जिकिरीचे काम त्यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक पार पाडले आहे. आतापर्यंत त्यांनी ज्ञातीतील जवळ जवळ २८ कुटुंबांच्या Family-Trees तयार केल्या आहेत.

Family Tree चा एक अनुभव :

ज्ञातीतील एका महिलेने तिच्या पतीच्या आकस्मिक निधनामुळे संघाकडे आर्थिक मदतीसाठी अर्ज केला, परंतु ती आपल्या ज्ञातीतीलच आहे हा पुरावा देऊ शकली नाही. बोलता बोलता तिच्याकडे D.N. नी केलेल्या Family Tree ची कॉपी असल्याचे तिने सांगितले. ह्यावरून तिच्या कुटुंबाची पूर्ण माहिती मिळाली व तिला योग्य ती आर्थिक मदत करण्यात आली. संघ व सोसायटीच्या AGM, D.N. च्या हजेरी शिवाय पूर्ण झाल्या नाहीत. चांगल्या कामासाठी त्यांच्याकडून मिळणारी शाबासकीची थाप, तसेच झालेल्या चुकांबद्दल त्यांनी व्यक्त केलेली नाराजी तितकीच हवीहवीशी वाटते.

अशा या बहुआयामी व्यक्तिमत्वाचे आपले D.N. यांना श्री. मंगेशाच्या कृपेने दीर्घ आयुरारोग्य लाभो ही प्रार्थना.

**मारुती वि. दळवी**
चेअरमन, NKGSB Sangh


**SHREE HOMOEPATHIC PHARMACY**
**Wholesale & Retail For :**
**Genuine Indian & Imported Homoeopathic Medicines**
Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane, Matunga (West), Mumbai - 400 016. Mob. : 83560 24542 / 98694 83433
Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**
**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) ,**
**Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**




## ॥ एक एके एकच ॥

आपल्या मुखपत्रिकेची तनमनाने, क्वचित प्रसंगी, धनानेसुद्धा ४५ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर एक व्यक्ती – श्री. दत्तात्रय नागेश नाडकर्णी, आपल्या संपादकीय पदाला अकस्मात रामराम ठोकणार हे आम्हां सर्व वाचकांना आत्मसात होण्यास किती दिवस लागतील हे शांताईच ठरवेल!

४५ वर्षांच्या आमच्या काही सवयी जेव्हा अचानक तुटल्या जातील, तेव्हाच आमच्या लक्षात येईल की, आपले ज्ञातीबांधव आपल्यापासून किती दूर आहेत. हे अंतर पूर्वी जाणवत नव्हते! सर्व ज्ञातीबांधवांच्या सुखदुःखाच्या अथांग सागरात आम्हीपण डुबक्या मारत होतो.

आता सर्वजण या सागरातून दूर फेकले जाण्याची शक्यता आहे.

आपल्या ज्ञातीबांधवांच्या सुखाचे, दुःखाचे तसेच आपल्या ज्ञातीचे–गौडसारस्वत ब्राह्मणांच्या

अप्रतिम बुद्धीमत्तेचे प्रात्यक्षिक ही मुखपत्रिका गेली ४५ वर्षे जाणवून देत होती.

या ''जाणीवे''चे सर्वेसर्वा श्री. दत्तात्रय नागेश नाडकर्णी यांना श्री. मंगेश–शांतादुर्गेच्या कृपेने भरपूर आयुष्य, मन:शांती, अपूर्व लाभ व अखिल गौ.सा.ब्रा. बांधवांचे तसेच इतरांचे भरपूर प्रेम लाभो व सदैव सेवा करण्याचे त्यांचे व्रत असेच राहो, हीच आम्हां सर्वांची प्रार्थना!

**– अरुण भास्कर कसबेकर**
**मो. 98202 91365 / 87799 86606**

## D.N. यांचे योगदान

प्रिय **D.N.,**

तुम्ही जे योगदान दिले आहे संघ, सोसायटी आणि मुखपत्रिकेसाठी तसे कोणीच देऊ शकणार नाही. मुखपत्रिकेमुळेच तुमच्याशी एक वेगळाच स्नेहबंध जुळला होता. काका, मामापेक्षा तुम्ही जेव्हा मला एक मैत्रीण म्हणालात, तेव्हा एक छान मित्रत्वाचे नाते तुमच्याशी जुळून आले. मुखपत्रिकेव्यतिरिक्त सुद्धा आपल्या अनेक गप्पा व्हायच्या, धनश्री लेले, फरिदा खातूनच्या गजला, कारवार असे अनेक विषय असायचे. चित्रा–विजय मुळे तुमच्या घरी येता आले. शरयूवहिनींची भेट झाली. ती कायमची लक्षात राहील. त्यांनाही वाचनाची गोडी होती. D.N. शिवाय 'मुखपत्रिका' हे सत्य पचविणे सगळ्यांनाच जड जाणार आहे. जरी तुमच्याशी बोलून संवाद साधता आला नाही तरी व्हॉटस्ॲपमुळे तुम्हांला माझं मनोगत सांगता आलं हे Technology चे उपकारच आहेत.

देव बरे करो. तुम्हाला चांगले आरोग्य लाभू दे हीच देवापशी प्रार्थना.

तुमची मैत्रीण
**मंजिरी**

## आपले डी.एन.

कारवारी विश्वात अत्यंत ख्यातनाम, प्रसिद्ध मुखपत्रिकाकार डी एन त्यांना न ओळखणारा माणूस विरळा.

गरिबांविषयी कळवळा, त्यांना वेळोवेळी मदत करणारा, साधे कपडे, निरपेक्ष वृत्ती चतुरस्त्र व्यक्तिमत्व म्हणजे डीएन.

मुखपत्रिका हे जणू त्यांचे अपत्य. वेळच्या वेळी प्रसिद्ध करून आपल्या अभ्यासू वृत्तीची, बुद्धिवादी झलक त्यांच्या प्रत्येक अंकाद्वारे लोकांना वाचावयास मिळते. कितीतरी माहितीचा स्रोत, वंशावळीतून लोकांच्या घराघरात पोहोचणारा असा हा डी.एन.

कोवीडच्या काळात तर संघाची समाजसेवा, मदत गरिबांना मिळणार नाही. कारण कार्यालय बंद असणे यावर त्यांनी स्वत: आपल्या पदरचे पैसे खर्च करून त्यांच्यापर्यंत पोचवले. नंतर संघाने त्यांना परतफेड केली ही गोष्ट अलाहिदा. पण अडचण ओळखणे हे डी.एन.च करू जाणे.

''देव बरे करू'' ही त्यांची प्रसिद्ध उक्ती. यातून त्यांचे सगळ्यांचे शुभचिंतन हेच दृष्टोत्पत्तीस येते. अशा या आपल्या डी.एन.ना आम्हां कारवारी बंधूभगिनींतर्फे चांगले आयुरारोग्य लाभो हीच ईश्वरचरणी सदिच्छा व प्रार्थना.

– **मृदुला भांडारकर,** गिरगांव
मो. ९३२२२३६२५७

## आमगेलो डी.एन.

मी दत्तात्रयभाऊंना जवळ जवळ सत्तर वर्षे ओळखत आहे. त्यांना विद्यार्थी दशेपासून गृहस्थीपर्यंतच्या आयुष्यात साथीदार म्हणून बघण्याचे मला भाग्य लाभले. जे येईल ते आयुष्य आनंदाने स्वीकारायचे. हा त्यांचा स्थायी भाव आहे.

सकारात्मक दृष्टिकोन, लाघवी स्वभाव, परोपकारी वृत्ती आणि उदात्त विचारसरणीमुळे सर्वात प्रिय झाले आहेत. कुठलेही केलेले काम नेहमी निर्दोष असावे हा त्यांचा बाणा आहे. ह्या वाढत्या वयात सुद्धा ते चिरतरूण आहेत. त्यांनी केलेले ४५ वर्षे मुखपत्रिकेचे संपादकीय काम त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष देत आहे. मुखपत्रिकेद्वारे आपल्या ज्ञातीबांधवांचे सुप्त आणि विखुरलेले गुण एकत्र करून त्याचा विकास केला आणि शैक्षणिक महत्त्व पटवून दिले त्याचा मला अभिमान वाटतो. त्यांनी ज्ञाती बांधवांना न दुखावता मुखपत्रिकेचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले हे त्यांचे अभिमानास्पद कर्तृत्व आहे. अशा माझ्या गुणवान चिरतरुण मार्गदर्शकाला आपली कुलदेवता दीर्घ आणि आनंदी आयुष्य देवो अशी तिच्या चरणी प्रार्थना करतो.

**– किशोर सबनीस – 9870332295**



## आदरणीय श्री. डी.एन. नाडकर्णी यांस

एप्रिल महिन्याच्या 'मुखपत्रिके'तील मजकूर वाचला आणि 'संपादकीय जबाबदारी'मधून तुमच्या निवृत्त होण्याची बातमी कळली. गेली पंचेचाळीस वर्षे 'मुखपत्रिके'ची जबाबदारी एकट्यांनी तंबूप्रमाणे तुम्ही मोठ्या कौशल्याने सांभाळली होती, हे माझ्याप्रमाणे सर्वच ज्ञातिबंधु आणि भगिनींचे निर्विवाद मत आहे!

एन.के.जी.एस.बी. संघाच्या सभासदांसाठीचे सर्वार्थाने परिपूर्ण आणि वाचनीय असे हे वार्तापत्र असे. संघ, एज्युकेशन सोसायटी, बँक या सर्वांबद्दलची माहिती यातून दिली जाईच. त्याशिवाय, सभासद व त्यांच्या कुटुंबियांपैकी लहानमोठ्या कोणीही कोणत्याही क्षेत्रात मिळविलेल्या यशाचे त्यात कौतुक असे. विद्यार्थ्यांच्या यशाला उत्तेजन, अन् त्यांच्या सर्वांगीण प्रगतीचा विचारही असे! एखादा विधायक उपक्रम सुरू करणाऱ्या सभासदाला प्रोत्साहन मिळे! दानशूर व्यक्तींच्या औदार्याला मुजरा आणि कलाकारांच्या कलाविष्काराला दाद असे! लेखनक्षेत्रात मुद्रा उमटविणाऱ्या सभासदांनाही रसिकतेने दिलेली पावती असे!

या सर्वांबरोबरच सभासद–कुटुंबातील तरुणांच्या वाङ्निश्चय–विवाहापासून रौप्य–सुवर्ण–सभारंभापर्यंत पोहोचलेल्या व्यक्तींचे अभिनंदन असे, तर वृद्धांच्या स्वास्थ्याचा परामर्शही असे! थोडक्यात सांगायचे, तर सभासदांच्या सुखदु:खांशी मुखपत्रिका निगडित करण्याचे मोठेच कार्य तुम्ही केले!

नवल असे की, हा सारा तपशील तुम्हांला मुखोद्गत असे! संघाच्या किंवा सभासदांच्या बाबतीत आवश्यक संदर्भ ज्यांना विचारता येतो, असा चालता बोलता ज्ञानकोषच (Encyclopedia) जसा काही! त्यामुळे तुमचे संपादकीयही वाचनीय असे!

तुम्ही प्रकृति–अस्वास्थ्यामुळे या कामातून मुक्त होत आहात, हे स्वीकारणे प्राप्त आहे. पण तुम्ही दाखवून दिलेली योग्य वाट नियोजित संपादकांना निश्चितच मार्गदर्शक ठरेल आणि स्वत:च्या कौशल्याची भर घालून 'मुखपत्रिके'ला अधिक जोमाने वाटचाल करण्याचे सामर्थ्य ते देतील, याची मला खात्री वाटते!

आरोग्याच्या अनेक शुभेच्छा!

**– श्रीमती नीलिमा शशिकान्त नाडकर्णी**

## श्री. डी.एन्. यांस सादर प्रणाम!

मुखपत्रिका मिळाली. निरोपाचे संपादकीय वाचताना डोळे पुन:पुन्हा भरून येत होते. विचारांचा इतका कल्लोळ उठला की, त्यापुढे ते व्यक्त करायला शब्दच सुचेनात. डी.एन्. शिवाय 'मुखपत्रिका' ही कल्पनाच करवत नाही, इतकी तुमची तिच्याशी एकरूपता. गेली ४५ वर्षे व्रतस्थपणाने संपादित केलेली छोटीशी 'सुबक ठेंगणी' मुखपत्रिका ही आमच्या कारवारकरांच्या रोजच्या आयुष्याचा एक भागच बनून राहिली आहे. तिने अवघ्या कारवारकरांच्यात एक अनुबंध निर्माण केला.

निवांत अशा कारवारहून मुंबईत येऊन स्थायिक झालेल्या आपल्या ज्ञातिबांधवांना तेथील धकाधकीच्या आयुष्याशी सामना करावा लागला. त्यातून गिरगावसारख्या नगरातून उपनगरात सगळीकडे विखुरल्यावर मुंबईतल्या मुंबईत राहून गाठीभेटी होणे कठीण झाले. तसेच गावाकडची (कारवार) खबरबातही दुर्मिळ झाली.

त्याकाळात खिशातल्या मोबाईलच्या गोष्टी तर सोडाच, पण साध्या लँडलाईन टेलिफोनसारखी संपर्काची साधनेही प्रत्येक घरात नसायची. अशावेळी मुखपत्रिकेने ती उणीव भरून काढली. नेहमीच्या वार्तापत्राहून अधिक असे हे मोजक्या पृष्ठांचे त्रैमासिक. त्याने किती विविध रूपे घ्यावीत! वडीलधाऱ्यांनी घरातल्या विद्यार्थ्यांचे, तरुणांचे कौतुक करावे, तसे ज्ञातीतील विद्यार्थ्यांचे यश, नव उद्योजकांच्या कर्तबगारीचा आलेख, लेखक लेखकांच्या नावाजलेल्या साहित्य निर्मितीचा गौरव मुखपत्रिकेने वेळोवेळी केलेला आहे.

''लिहायचे तर आहे, पण लिहू कसे?'' अशा संभ्रमात पडलेल्या नवोदित लेखकांना तुम्ही प्रोत्साहन देऊन लिहिते केलेत. यामुळे छोट्या छोट्या लेखांतून आपल्या आप्तसुहृदांच्या जागवलेल्या आठवणी, त्यांची व्यक्तिचित्रे, काही विनोदी किस्से या स्वरुपात त्यांना व्यक्त होता आले. तसेच श्री. अरुण कसबेकरांसारख्या विविध क्षेत्रात वावरलेल्या अनुभवी व्यक्तीने लिहिलेले त्यांचे बरे-वाईट अनुभव, घडलेले निरनिराळे किस्से व सकारात्मक दृष्टिकोन, यामुळे त्यांचे लिखाण वाचणाऱ्याला एक प्रकारची सकारात्मक ऊर्जा मिळत जाते.

ज्ञातीतील घडलेल्या बऱ्या-वाईट प्रसंगांची इत्थंभूत बातमी ज्ञातिबांधवांना वेळोवेळी मिळत असते. ज्ञातिबांधवांनी आपल्या संघाने आरंभिलेल्या समाजकार्यासाठी दिलेल्या छोट्या-मोठ्या देणग्यांचा उल्लेख इतर बांधवांनाही आपल्या समाजाप्रती कृतज्ञता दाखवण्याची प्रेरणा देतो. प्रासंगिक सभासंमेलनाचे, हळदीकुंकू समारंभाचे, सहल, वैद्यकीय शिबीर इत्यादी उपक्रमांचे सर्वांना दिलेले निमंत्रण, हे सर्व घरातल्या एखाद्या जाणत्या माणसाने जणू आखून दिल्याप्रमाणे मुखपत्रिका करीत आली आहे. अजूनही कैक गोष्टी अनअवधनाने उल्लेख करण्याच्या राहून गेल्या असतील. तरीदेखील ही गोष्ट मात्र खरी की, या छोट्या चणीच्या मुखपत्रिकेत आपल्या अवघ्या ज्ञातिबांधवांचे भावनाविश्व साठलेले दिसून येते.

या सर्वाचे श्रेय अर्थात डी.एन्., तुमच्या संपादकीय कौशल्याकडे जाते. गेली ४५ वर्षे यशस्वीपणे उचललेले शिवधनुष्य खाली ठेवताना आम्हां समाजबांधवांइतकेच तुम्हालाही वियोगाचे दु:ख होणारच. पण त्याचबरोबर कृतार्थतेचे समाधान देखील वाटत असेल. होय ना? नव्याने येणारे संपादक श्री. प्रसाद (पंकज) मोहन कसबेकर यांचे पहिले संपादकीय मनोगत ही धुरा स्वीकारल्याचे विनम्रपणे सांगते. तुम्ही घालून दिलेला शिरस्ता, त्याच्या आधारे काळाशी सुसंगत अशा नव्या कल्पनांची भर पाडून तरुण पिढीला यात समाविष्ट करून ही मुखपत्रिका पुढील वाटचाल अशाच उमेदीने करील अशी आशा बाळगते.

तुमच्या मनोगतात तुमचे मार्गदर्शक, गुरु आणि आदर्श असलेल्या फ्री प्रेस जर्नलचे डी.एन्. नाडकर्णी यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला आहे. त्यांनी आपल्या ज्ञातीसाठी केलेल्या समाजकार्याची जबाबदारी शिष्य या नात्याने तुम्ही उचललीत. पुनरुक्तीचा दोष पत्करून पुन्हा सांगते की देशात, परदेशात विखुरलेल्या या मूळच्या कारवारकरांना मुखपत्रिकेच्या सूत्रबंधनाने एकत्र बांधलेलं हे बंधन मायेचे, प्रेमाचे आहे. आज प्रत्येक कारवारकर जो तुम्हाला जाणतो तो तुम्हाला आपल्या घरातलाच वडीलधारा मानतो, आणि यासाठीच तुमच्या प्रकृतीचे स्वास्थ्य महत्त्वाचे आहे. तुमचे यापुढील आयुष्य निरामय आणि निवांत जावे, हीच जगन्नियंत्या परमेश्वराचरणी प्रार्थना.

आपली नम्र,

**शैलजा मंगेश नाडकर्णी**, शिवाजीपार्क
**मो. नंबर : ९८२०१७९३८५**



## द. ना. नाडकर्णी - एक अलौकिक व्यक्तिमत्व

एप्रिल २०२३ च्या अंकात पृष्ठ क्र. २ वर 'अखेरचा हा तुला दंडवत' हा छोटेखानी लेख श्री. द. ना. नाडकर्णी ह्यांनी लिहिला आहे. वाचून मन विषण्ण झाले. त्यांच्यावर एक माझ्यापरिने छान लेख लिहायचा असे ठरवून लगेच लिहायला सुरुवात केली. कारवारकरांमध्ये श्री. द. ना. नाडकर्णी हे नाव ठाऊक नाही म्हणणारा अगदीच विरळा म्हणायला हवा.

गेली ४५ वर्षे सातत्याने मुखपत्रिका दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक वृत्तविलास पत्रिका – अविरतपणे न कंटाळता त्याच उत्साहाने, उमेदीने चालविणे म्हणजे येरा-गबाळाचे काम नव्हे. स्वत:हून पुढे सरसावून 'संपादक' म्हणून श्री. द. ना. नाडकर्णींनी कारवारकरांमध्ये विश्वास निर्माण केला, आपुलकी निर्माण केली. ह्या पत्रिकेविषयी उत्सुकता सर्वांच्या मनात जागृत केली नि हे सर्व करताना आपली नोकरी सांभाळून, संसाराकडे दुर्लक्ष न करता त्यांना कै. सौ. शरयू वहिनींची उत्तम साथ लाभली. उभयतांना माझे त्रिवार वंदन.

श्री. द. ना. नाडकर्णी हे आपल्या ज्ञातीतील encyclopedia - सर्वज्ञ – त्यांना ठाऊक नाही असा एखादा विषय नसावा. सगळ्यांशी अगदी मिळून मिसळून संवाद साधणे त्यांत ते वाकबगार. कुणीही कोणत्या समारंभास आमंत्रण दिल्यास ते स्वत:हून त्या कार्यक्रमास हजर रहात असत. अगदी आपुलकीने व आत्मीयतेने, आस्थेने त्या समारंभात सर्वांशी जवळीक साधत. ही त्यांची खासीयत!

मला अभिमान आहे की ते आमच्या हिंदू हायस्कूलचे विद्यार्थी. १९९७ साली जानेवारी २-३-४ तारखेस शाळेचा शताब्दी महोत्सव झाला त्यावेळी ते आपणहून ८ दिवस आधीच कारवारला आले नि त्यांनी शाळेच्या व्यवस्थापन मंडळास उत्तम सहाय्य केले. परंतु २०२३ जानेवारी २१, २२, २३ ला साजरा झालेल्या स. रजत जयंती शताब्दी सोहळ्यास ते प्रकृती अस्वास्थ्यामुळे हजर राहू शकले नाहीत. त्यांना त्यावेळी मुंबईत किती मानसिक क्लेश झाले असतील?

कारवारमध्ये २५ वर्षांपूर्वी कोकण रेल्वे सुरू झाली तेव्हा श्री. दत्तात्रय नागेश नाडकर्णी (तोत्या) व गुरुनाथ पिकळे (पोपटभाई) हे दोघे स्नेही प्रथम आगगाडीने कारवार रेल्वे स्टेशनवर उतरलेले पहिले कारवारकर. अजूनही श्री. द. ना. नाडकर्णींकडे त्या पहिल्या कारवार प्रवासाचे तिकीट आहे. हे दोघे तोत्या व पोपट ह्या नावाने कारवारकरांमध्ये परिचित. आज दोघांची ९० कडे वाटचाल चालू आहे. आपले कुलदैवत श्री. शांतादुर्गा, मंगेश, महालक्ष्मीकडे प्रार्थना की त्या उभयतांना उत्तम आरोग्य, उत्साह व शक्ती देऊन शतायुषीच नव्हे तर दीर्घायुषी करावे.

श्री. द. ना नाडकर्णींना मी तरी आपल्या समाजातील 'सर्वज्ञ' समजतो. आपल्या ज्ञातीतील अनेकांची त्यांनी वंशावळ तयार केली आहे हे अत्यंत किचकट व जोखीमीचे काम त्यांनी यशस्वीपणे पार पाडलेले आहे. मुंबईला राहूनही कारवारविषयी त्यांना आस्था.

सदाशिवगड येथील सदाशिवगड हायस्कूल २००० च्या सुमारास फार कठीण व हलाखीच्या स्थितीतून जात होते. त्यावेळी मी निवृत्त झालो होतो. तेव्हा त्यांनी अट्टाहासाने मला तेथे – chairman – अध्यक्ष होण्यास भाग पाडले. मी तेथे १५ वर्षे अध्यक्ष म्हणून कार्यभार सांभाळून ती संस्था सुस्थितीत आणून बाहेर पडलो. माणसें पारखणे हा त्यांचा एक गुण.

असे हे हरहुन्नरी प्रभावशाली व्यक्तिमत्व. त्यांच्या विषयी किती लिहिले तरी कमीच. जागे अभावी मी हा लेख समाप्त करतो. देव त्यांना नेहमीच हसतखेळत सुख–समृद्धीत, उत्साही ठेवो.

**– शांताराम (अरुण) कुलकर्णी,** कारवार
मो. ७९७२४५८७८२

## एक वेगळे समर्पित व्यक्तिमत्व - डी.एन्.

एप्रिलची मुखपत्रिका मिळाली अन् डी.एन्.ने लिहिलेले 'अखेरचा दंडवत' हे दोन शब्द वाचल्याबरोबर मनात काहूर उठलं ते अनेक आठवणींचं. म्हणून अस्वस्थ मनाने लिहायला घेतले.

'कोंकणी' आमगेली बोलीभाषा. असे आपण अभिमानाने म्हणतो पण आमच्या लोकांच्या मानगुटीवर अजून इंग्रजीचं भूत बसलेलं दिसतं. आमगेली भाषेत एक प्रकारचा 'एकेरी' संबोधनाचा गोडवा आहे तर परभाषेत 'आदरार्थी' संबोधनाचा दुरावा आहे. म्हणून आज मी लेख लिहिणार आहे तो आमच्या मुखपत्रिकेच्या माजी 'संपादक' म्हणजेच सर्वश्रुत 'डी.एन्.'बद्दल होय.

गेली अनेक वर्षे मी सातत्याने लिहिले. तसं पाहिलं तर मी लोणावळ्याला होते अन् मुंबई माझ्यापासून योजने दूर. त्यामुळे मा. डी.एन्.ची चारपाच वेळा भेट झाली असावी. आतापर्यंत फोनाफोनी चालत असे. जानेवारीत त्याचा वाढदिवस येतो. न चुकता मी फोन करते. आता मला वाटलं की या 'विश्वकोशा'बद्दल पुन्हा लिहावे. त्याला मी 'विश्वकोश' म्हणते. कारण लोणावळ्याला असल्यामुळे नातेवाईक, सगेसोयरे ह्या पासून अलिप्त होते. जेव्हा मी त्याला फोन करते तेव्हा सर्वांची माहिती मिळते. माझ्या नाडकर्णी अन् देसाईची 'वंशावळी' करून मला पाठवली आहे.

मला आवर्जून लिहावसं वाटतं की ही व्यक्ती इतक्या आत्मीयतेने, तन्मयतेने अन् सातत्याने संपादक म्हणून काम पहात होते. अगदी जणू संपूर्ण जीवन पत्रिकेला अर्पण केले होते. त्याची ओळख झाल्यामुळे आमचे कौटुंबिक नाते तयार झाले. मी माहेरची (अगळी) नाडकर्णी व तो नाडकर्णी. दोघे एकाच वर्षात जन्माला आलेले समवयस्क हा एक मोठा योगायोग होय.

कुठेही गाजावाजा न करता पत्रिकेचे आतापर्यंत काम करत राहिला.आभाळ पेलण्याची ताकद श्री मंगेशाच्या कृपेने एखाद्यालाच मिळते. मैत्री अन् स्नेहाच्या नात्याचे बंध अतूय असतात. मला ते 'बहिणाबाई' गमतीने म्हणायचे अन् प्रत्येक वाढदिवसाला सकाळी शुभेच्छाचा फोन करायचे.

मला त्याच्याबद्दल वाटलेल्या भावना व्यक्त करण्यासाठी त्याला फोन केला. तो म्हणाला, 'कुंदा असा वेडेपणा करू नको. मी पत्रिकेचा संपादक आहे. माझ्या भावना समजून घे.' अखेर



बड्या मिन्नतवारीने तो तयार झाला अन् काही वर्षापूर्वी पत्रिकेत तो लेख प्रकाशित झाला. आज त्याची आठवण झाली.

हळुवार बहरणारी, मनाला भावणारी, आनंददायक अशी एकच गोष्ट ती म्हणजे त्याच्याबद्दल वाटणारी आपुलकी, जिव्हाळा, आणि आदर्श होय. त्याच्या जीवनातील दीर्घ प्रवासातील 'पंच्याऐंशी' हा एक अनोखा 'अमृतानुभव' होय. त्याला मिळालेल्या अनुभवाचा फायदा सध्याचे मा. श्री. प्रसाद कसबेकर घेतील अशी खात्री आहे. मला इतकेच म्हणायचे आहे की, 'अखेरचा दंडवत' दोन शब्द तुझ्या लेखणीतून कसे काय उतरले हे मला पडलेलं स्वप्न वाटतं. तू तुझी तब्येत सांभाळ आणि तुझ्याकडून नवीन संपादकालाच नव्हे तर आम्हा लेखकांना ऊर्जा मिळो. ही श्री मंगेशाकडे प्रार्थना. मा. श्री. कसबेकरांना नवीन कार्याबद्दल हार्दिक शुभेच्छा.

**–कुंदा र. देसाई,** मुंबई मो.९८१९०५२३१९

## *श्री. द. ना. नाडकर्णी यांना आदरणीय निरोप आणि प्रसाद कसबेकर आपले स्वागत*

४५ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर मुखपत्रिकाकार श्री. द. ना. नाडकर्णी यांनी आपली निवृत्ती जाहीर केली. वाचून वाईट वाटले. पण त्यांचे वय आणि प्राकृतिक अस्वास्थ्य याचा विचार केल्यानंतर त्यांचा निर्णय उचित होता असे वाटले.

समाजाचे सेवाकार्य करणे आणि त्या समाजाने त्या व्यक्तीकडून सेवेची अपेक्षा करणे ह्याला सुद्धा एक मर्यादा असते. द. ना.चे थोडक्या शब्दात मुद्देसुद, अर्थपूर्ण लिखाण, समाज बांधवांकडून विविध विषयांवर माहिती मिळविण्याची तळमळ, उत्तम स्मरणशक्ती वाखाणण्यासारखी आहे.


संदर्भ ग्रंथ आणि विविध विषयांवर त्यांनी केलेले लिखाण, माहिती याचा ठेवा त्यांच्या घरात साठविला आहे. हा मोलाचा ठेवा त्यांच्या परवानगीने जतन करून ठेवणे हे सुद्धा सामाजिक कार्य आहे असे मला वाटते.

मी श्री मंगेशाकडे द.ना.च्या प्रकृती स्वास्थ्यासाठी प्रार्थना करतो.

श्री. प्रसाद (पंकज) कसबेकरसारखे सिद्ध पुरुष मुखपत्रिकेच्या कामाचा भार घेण्यास लगेच तयार झाले हे संस्थेने केलेल्या पूर्व पुण्याईचे फळ आहे असे समजतो.

द.ना.चे मार्गदर्शन, समाजाच्या आवडीप्रमाणे सकारात्मक लिखाण केल्यास आपणास उत्तम प्रतिसाद मिळेल हे नक्कीच. All the Best!

**सुरेश पालेकर,** ठाणे मंच
८९२८८५०१९३






## ''यातून बाहेर कसे पडायचे?''

पूर्वी कारवारांत शाळेत जाताना आजी पेज आणि मायाळूची भाजी (वाळी भाजी) किंवा इतर कुठलीही पातळ (रस्सा) भाजी करायची आणि आम्ही ते अगदी आवडीने संपवायचो. हाच होता आमचा रोजचा सकाळचा ब्रेकफास्ट!

खरेच! संपूर्ण जग मी अनेक वेळा पालथे घातले आहे. बऱ्याच ठिकाणी ५ स्टार–७ स्टार हॉटेल्समध्येही राहिलो आहे. पण जगातल्या कुठल्याही ब्रेकफास्टला, आजीच्या हातच्या बनविलेल्या उकड्या तांदळाची पेज, एखादी रस्सा भाजी तसेच खास कोळशांच्या निखाऱ्यावर भाजलेली सुकी मासळीने जे समाधान मिळत होते ते एकदाही कुठेही प्राप्त झाले नाही. याला काय कारण असावे, हे पूर्णपणे माझ्या आकलनाच्या पलीकडचे आहे. कदाचित, आजीच्या हाताचा स्पर्श, तिचे आमच्यावर असलेले आत्यंतिक प्रेम, आजोबांनी उतारवयात सुद्धा चालत, कधी अनवाणीसुद्धा, विक्रेत्यांशी हुज्जत घालून, दोन–तीन आणे वाचवून स्वत: निवडून आणलेली ताजी–ताजी भाजीच कारणीभूत असेल. माझ्या आजी–आजोबांनी प्रेमाने बनविलेल्या पेज आणि रस्सा भाजीची काही किंमत ठरविता येईल काय? मी तरी ठरवू शकलो नाही.

मुंबईहून दर महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात बाबा, आजोबा–आजी आणि आम्हां दोघां नातवंडांच्या खर्चाचे म्हणून रु. २०० पाठवायचे. ही १९५३–५४ मधील हकिकत आहे. आजोबांची एक लाकडी पेटी होती. तिला ''काडतेरी'' म्हणत. त्या पेटीत आजोबा ते पैसे ठेवत, त्यात खर्च केलेल्या एकेका पैशाचा हिशोबही लिहिलेला असे. एकदा हिशोबात एका पैशाची तफावत आढळली आणि शपथेवर सांगतो कमीत–कमी तीन तास, घरातले सर्वजण, तो एक पैसा शोधण्यामागे लागले होते. शेवटी पलंगाच्या एका खुराखाली तो तांब्याचा, मध्ये भोक असलेला पैसा सापडला आणि आम्ही सर्वांनी सुटकेचा सुस्कारा सोडला!!

कधी नव्हे ते एकदा बाबा कारवारजवळ असलेल्या ''खारगे' गावांत गेले होते. खारग्याला आमची बरीच शेतजमीन होती व शेतीत पिकविलेल्या धान्याचा काही भाग ''गेण'' म्हणून दरवर्षी आम्हाला पाठविला जात असे. आमचे शेत मशागत करणाऱ्या शेतकऱ्यांची घरे आणि त्यांचे राहणीमान बाबांनी प्रत्यक्ष त्यांच्या घरी जाऊन पाहिले आणि त्यांची परिस्थिती बघून बाबांचे डोळे ओलावले. यावर ते शेतकऱ्यांना म्हणाले, ''तुम्ही कष्ट करून पिकविलेल्या धान्यावरच हा देह एवढा मोठा झाला आहे आणि मी तुम्हाला मोठ्या आदराने आणि श्रद्धेने नमस्कार करतो व विनंतीही करीत आहे की, आजपासून तुम्ही आम्हाला ही ''गेण'' द्यायची काहीच गरज नाही व ही सर्व जमीन या क्षणापासून केवळ तुमचीच राहील.'' मोठ्या समाधानाने पण अतीव चिंतेने ते कारवारला परतले. खरे तर त्यांनी आजोबा–आजी, काका व इतर बहिणींची पूर्व परवानगी घेणे आवश्यक होते. पण नवल असे की, सर्वांनी त्यांच्या निर्णयाला मोठ्या आनंदाने व तितक्याच उत्स्फूर्ततेने अनुमोदनच दिले. इतकेच नव्हे, ज्या आजोबांनी आम्हाला तीन तास, तांब्याचा भोकाचा पैसा शोधण्यास लावले होते, त्यांनी सर्वाआधी बाबांचे कौतुक केले व स्पष्ट म्हटले की, त्यांना स्वत:ला मनात असूनसुद्धा तसा निर्णय घेण्याची हिंमत झाली नाही. कालांतराने १९७४ मध्ये ''कसेल त्याची जमीन'' हा शासनाचा कायदाच झाला. पण माझ्या आजोबांनी तो कायदा स्वत:च्या शेतात १५–२० वर्षे आधीच अमलांत आणला आणि पाळला.

काय म्हणणार तुम्ही या अशा वृत्तीला? आमचे वाडवडीलच असे होते असे म्हणणे अगदीच चुकीचे ठरेल. मी तर असे म्हणेन की, सगळे कारवारकरच तसे होते. केवळ हिंदूच नव्हे तर सर्व जातीचे!

शाळेत असताना मला चांगले आठवते – ख्रिसमस, ईद व इतर सण आम्ही एकत्र साजरे करायचो. इतर जातीच्या मित्रांकडे, त्यांच्या घरी खास अशा सणांना, त्यांचे अभिनंदन करावयास जायचो. ''केवळ अभिनंदन करण्यास जायचो'' – असे म्हणणे जरा मिथ्यांवचनच ठरेल. मुख्य उद्देश काही मिठाई किंवा केकचा तुकडा निश्चितच हाती लागेल!

गेले ते दिवस! आज सर्व काही आहे! भरपूर आहे! पण कशातही मनापासून सुख वाटतच नाही! समाधानाचा तर पत्ताच नाही. जे प्रेम पूर्वी आम्हाला सर्वत्र, झाडी–झुडपे आणि प्राणीमात्रांतसुद्धा दिसायचे त्याची आता जाणीवसुद्धा होत नाही. असे वाटते की, सर्वजण अजाणतेपणे प्रत्येक क्षण पुढे ढकलत आहे.

यातून बाहेर कसे पडायचे?

**अरुण भास्कर कसबेकर**
९८२०२९१३६५/८७७९९८६६०६


A name that spells its class !

**WINOVER**

**CATERERS**

**Marriages, Thread Ceremonies,**
**Engagement and Birthday Parties Etc.**

**WE DELIVER FOOD / SNACKS FOR PARTIES AT HOME**
**Take away and TIFFINS**
**Or opt for Ala-carte**
**Amchi food and Variety cuisines**
ALL OVER MUMBAI-THANE-VIRAR

**Call or Whatsapp for our take away menu**
**Vinod Kaval / Ashwini / Rupali**
**98208 43392 / 90048 41198 / 98923 00608**

**Shop No. 4, Andrea Apartment off Azad Road,**
**Vile Parle East, Mumbai - 400 057**




## 'कवडसे मनाचे' वर प्रतिक्रिया

अरुणभाऊ कसबेकर यांचे 'कवडसे मनाचे' हे पहिले वहिले साहित्यिक अपत्य आणि मंचच्या स्नेह संमेलनात खुद्द त्यांच्याच शुभहस्ते ते मला भेट म्हणून मिळाले. गोव्यात परतल्यावर मी ते लगेच वाचले आणि त्यांना फोनवरूनच त्याची पावती दिली. तरीही मुखपत्रिकेत त्याविषयीची प्रतिक्रिया द्यावी म्हणून हा प्रपंच!

या पुस्तकातले विविधरंगी लेख म्हणजे अरुणभाऊंच्या जीवनात घडलेल्या अनेक प्रसंगांचे, विचारांचे आणि आठवणींचे शब्दरूपी कवडसेच म्हणायला हवे. त्यामुळे पुस्तकाचं शीर्षक यथोचितच. शालेय जीवनापासून आतापर्यंत आयुष्यातील मनात साठलेल्या अनेक भल्या–बुऱ्या अनुभवांना त्यांनी इथे मुक्त केले आहे. संकोच–भीड यांना कथनात स्थान न देता अत्यंत प्रामाणिकपणे अनुभवांची मांडणी केली आहे. पौगंडावस्थेत केलेलं धुम्रपान, मद्यपान नंतरची रेस, खेळण्याची लागलेली चटक इत्यादी व्यसनांविषयी ते बेधडकपणे लिहून जातात. त्यांच्या लेखनाच्या सच्चेपणामुळे, प्रांजळपणामुळे पुस्तकांचं अंतरसौंदर्य नक्कीच खुललं आहे. रसिकतेच्या भोक्ता असलेल्या अरुणभाऊंना आपल्या घरातील वडीलधाऱ्यांविषयी आपल्या गुरुजनांविषयी मनात ठाण मांडून बसलेला आदरभाव त्यांनी ठायी ठायी व्यक्त केलेला आहे. त्यांनी दिलेल्या संस्कार शिदोरीवरच आपलं मानसिक आणि बौद्धिक पोषण झाल्याने आज ज्या यशाच्या पायरीवर ते उभे आहेत, त्याचं श्रेय ते विनम्रपणे त्यांनाच देतात. तसेच श्री शांतादुर्गेचा परम भक्त असलेल्या या भक्ताला त्यांच्या कठीण समयी देवीने कसे तारून नेले याचीही उदाहरणे वाचायला मिळतात.

पुस्तकात स्वत:चे अनुभव कथन करत असतानाच समाजहितासाठी ज्ञातिबांधवांसाठी केलेल्या सूचना संस्थांचाही अंतर्भाव केलेला आहे. अधेमधे विनोदाचे छिडकावे टाकून गंभीर विषयाला हास्याची झालरही लावली गेली आहे. पुस्तकाच्या शेवटी कुणाचीही मने दुखावली गेली असतील तर त्यांची विनम्रभावे माफीही त्यांनी मागितली आहे.

अशा या वाचनीय 'कवडसे मनाचे'चा दुसरा भाग वाचकांसमोर लवकरच यावा या अपेक्षेसह इथेच थांबते.

धन्यवाद!

**– मीरा निशीथ प्रभूवेर्लेकर**

# Friends and Well wishers of Karwar

I just recently visited Karwar and was quite sturnned by the changes I saw. The roads have widened and reality not even recognizable.4-5 storey buildings are quite common place and there are plenty number of restaurants and hotels. Please note that these don't include the resorts along the beach at Kodibagh or Maajali.

You can get any kind of cuisine you desire but of course I loved the seafood. We had a small get together of cousins and we ordered food from Shweta lunch home. The food was amazing and it reminded me of the days when mummy made the food at Ram Krupa (our home).

Nitin Pikle, my cousin is current President of Karwar municipality and he along with the District Commissioner Mr. Naik have done a fantastic job with cleanliness. They have won the prestigious Swatcha Bharat award from the Central Government.

Nitin is on the third year of his five year term. Karwar was lucky to get an educated forward thinking leader. On asking if there was anything that we could do for Karwar, his point was that they need more tree planted (your name is on the tree), street lights, a water filter source for the public drinking in summer.

They've built a place for labourers/workers to stay for Rs. 100 a night and there is even a women's shelter built all in the municipal building. Garbage pickup takes place everyday and compost is made and used. There is also an e-trash pickup in line with growing needs of the citizens. Clearly all these things add to the community life in Karwar. They also want to build a Buddha statue on a round about.

All these projects are driven to achieve substainability, eco friendly environments and basic civic amenities to population at large.

I urge you to please contribute to this very worthy cause. I'm sure you agree that we must try and keep up the progress that they've made. The earlier you do the better because I trust that between Nitin and Commissioner Naik will do all that is required.

Any amount is great amout to shape Karwar iinto a model city.
Here is a website for you to persue for more details.

Karwarcity.mrc.gov.in

**-- VANDANA KENKRE.**



# *कारवारी सारस्वत पाककृती*

**– सौ. अश्विनी व्यं. कुलकर्णी,** मोबाईल नं. ९८३३३१३१७०

मी सौ. अश्विनी व्यंकटेश कुलकर्णी, पारले पूर्व येथे राहणारी. मला रोज नवनवीन पदार्थ करून बघायची पहिल्यापासूनच आवड. हा छंद जोपासत मी काही पदार्थ अधूनमधून आपल्या मुखपत्रिकेतून पाठवत असते.

**आजचा पदार्थ**

**१) कारवारी तांदळाचे थालीपीठ**

**साहित्य :** २ वाट्या चाळून घेतलेले तांदळाचे पीठ, मीठ, ५–६ हिरव्या मिरच्या, अर्धी वाटी दाण्याचे कूट, १ वाटी खोवलेले खोबरे, आल्याचा तुकडा, कढीपत्त्याची ७–८ पाने, साखर, कोथिंबीर आणि २ मोठे कांदे बारीक चिरलेले.

**कृती :** प्रथम तांदळाचे पीठ व्यवस्थित चाळून घेणे. मग एका परातीत कांदे बारीक चिरून त्यास चवीला थोडे मीठ लावून ठेवणे. १० मिनिटांनंतर त्यात तांदळाचे पीठ, कांदा, मीठ घेणे. बघून थोडे मीठ, चवीला साखर, मिरच्या, आले कढीपत्ता यांचा वाटलेला खवडा, दाण्याचे कूट, खोवलेले खोबरे, बारीक चिरलेली कोथिंबीर आणि १ चमचा खोबरेल तेल घालून कोमट पाण्याने पीठ छान मळून घेणे. १० मिनिटे तसेच पीठ मुरवून घेणे आणि मग तवा गरम करून खोबरेल तेलावर मध्यम आकाराची थालीपीठे घालून घेणे. घरचे ताजे लोणी व घरी बनवलेली दाण्याची चटणी यासोबत खाणे.

**२) साबुदाणा व चण्याची डाळ यांचे मणगणे**

(श्रावण महिन्यात नवरात्रीत कारवारी लोकांच्या घरी हमखास बनवला जाणारा हमखास गोड पदार्थ)

**साहित्य :** १ वाटी चणा डाळ, अर्धी वाटी साबुदाणा, आवडीनुसार गूळ, पाव चमचा मीठ, १ चमचा साखर, दूध, खवलेला नारळ, वेलची, जायफळ पावडर, केशर, मनुके, काजू, बदामाचे तुकडे आणि तूप.

**कृती :** प्रथम साबुदाणा कोरडाच भाजून घेणे. भाजून घेतल्याने साबुदाणा पचायला हलका होतो. चण्याची डाळ निवडून स्वच्छ धुवून १ तास भिजत घालणे. साबुदाणा पण स्वच्छ धुवून अर्धा तास भिजवणे. नंतर कुकरमध्ये चण्याची डाळ थोडे तूप घालून दोन शिट्ट्या काढून शिजवून घेणे. मग एका कढईमध्ये १ चमचा तूप घालून थोडे काजू व बदामाचे तुकडे तळून घेणे. मग नारळ आणि गूळ एकत्र वाटून रस काढून घेणे. कढईमध्ये शिजवलेली चणा डाळ, भिजवलेला साबुदाणा आणि थोडे कोमट पाणी घालून २ मिनिटे उकळून घेणे. साबुदाणा लवकर शिजतो. मग त्यात खोबऱ्याचे वाटण, १ चमचा साखर, वेलची, जायफळ पावडर, दुधात भिजलेले केशर घालून मणगणे छान शिजवून घेणे. डाळ, साबुदाणा शिजवून घेतलेले असल्याने जास्त वेळ उकळू नये. गरम गरम मणगणे भांड्यात काढून त्यावर उरलेले काजू, बदाम व मनुका घालून सर्व्ह करणे. पुरी/चपातीसोबत मणगणे खूपच चविष्ट लागते.


**टीप :** मणगणे खाली उतरवून मग त्यात पाव चमचा मीठ घालणे. गॅसवरती उकळताना मीठ घातले तर नारळ दूध फाटू शकते. म्हणून मीठ शेवटी घालावे.

# MANGSIDESH INVESTMENTS PVT LTD

MSIPL

402, Business Point, Paliram Road, Off S.V.Road, Behind Brahma Kumari Hospital, Andheri (West), Mumbai 400 058

Tel No. 022-4233 2323/ 6584 1233/ 6523 8964/ 98337 22444




Can we help you to achieve your goal???

& your goal is....

Let's reach nearer

To your highest GOAL!!!

Step by step....




*A little every month grows to something significant over time!!!*

*Invest Rs.1000/- Per month & get...*

| Investment Years | Total Investment | Growth Rate 8% | Growth Rate 12% | Growth Rate 15% |
|---|---|---|---|---|
| 15 | 180,000 | 348,000 | 504,000 | 676,000 |
| 20 | 240,000 | 593,000 | 999,000 | 1,516,000 |
| 23 | 276,000 | 794,000 | 1,473,000 | 2,417,000 |
| 25 | 300,000 | 957,000 | 1,898,000 | 3,284,000 |
| 30 | 360,000 | 1,500,000 | 3,530,000 | 7,010,000 |
| 32 | 384,000 | 1,786,000 | 4,509,000 | 9,473,000 |
| 35 | 420,000 | 2,309,000 | 6,495,000 | 14,860,000 |




***Indian Equity market has given average 16% return s in last 32 year s...***

Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully before investing.




# ठाणे मंच सादर करीत आहे
# ‘नाचो नाचो’ नृत्य आविष्कार

प्रत्येक माणसाला सूर आणि ताल याची थोडीफार जाण व देणगी निसर्गत:च मिळते. कलाकार या वरदानाचा विकास करून कलेत, नृत्यात प्राविण्य मिळवतात.

नृत्य हा सर्व समाजात पारंपरिक संस्कृतीचा भाग आहे. प्रत्येक आनंदाच्या क्षणी आपण विविध प्रकारच्या नृत्यातून आपला आनंद साजरा करतो. त्यासाठी वयाचे भान ठेवत नाही.

**‘नाचो नाचो’** या संकल्पनेतून आपण नृत्यात भाग घ्यायचा आहे. सोलो डान्स, ग्रुप डान्स अशा विविध प्रकारच्या नृत्यांत आपण भाग घेऊ शकतात.

वयाची अट नाही. आपली नावे आम्हांस त्वरीत कळवल्यास ऑक्टोबर–डिसेंबर २०२३ च्या मुखपत्रिकेतून आम्ही कार्यक्रमाची तारीख, वेळ आणि मुंबईत नृत्यास योग्य असा हॉल घेऊन आपणांस कळवू.

**संपर्क**

| सुरेश पालेकर | राजेश दिवेकर | गिरीश रेगे |
|---|---|---|
| ९९६९४५५३७० | ९६१९३६२४६० | ९९२२९६८७२५ |

(व्हॉटस्‌ॲपने संपर्क साधा)

## YOGA AS REMEDY TO COPE WITH FAST LIFE

Each one has several responsibilities and duties and one does more and this causes n resultant ailment . Yoga is good remedy. Benefits are :

**' Advantages of Yoga '**

* Yoga improves strength, balance and flexibility.
* Yoga helps with back pain relief.
* Yoga can ease arthritis symptoms.
* Yoga benfits heart health …
* Yoga relaxes you, to help you sleep better.

This can be done with a trainer, who r now available.

**- CA Deepak**
**email : drgude60@yahoo.com**

## मुंबई मंच

मुंबई स्थित सर्व ज्ञातिबांधवांसाठी आपल्या संघाने २००८ मध्ये मुंबई मंचची स्थापना केली. त्यानंतर सतत दरवर्षी मुंबई मंच तर्फे विविध कार्यक्रम योजण्यात आले व त्याला आपणा सर्वांचा प्रचंड प्रतिसादही लाभला. (उदा. जोगेश्वरी मेळावा वगैरे) याबद्दल आपणा सर्वांचे आम्ही कृतज्ञ आहोत.

परंतु नंतर गेली काही वर्षे मुंबई मंचच्या उपक्रमामध्ये शिथीलता आली व कार्यक्रम होईनातसे झाले. आता पुन्हा आम्ही मुंबई मंचला जागृत करून काही ठोस उपक्रम उदा. सहली, मेळावे, सांस्कृतिक कार्यक्रम वगैरे करण्याचे योजित आहोत.

याबद्दल विवेक कुलकर्णींकडेही सविस्तर चर्चा होऊन आम्ही मुंबई मंच पुनश्च जिवीत करण्याचे योजिले आहे. तरी या अनुषंगाने तरुण–तरुणी तसेच वृद्ध, महिला या सर्वांनी हिरीरीने भाग घ्यावा व त्यासाठी नावे मुंबई मंच प्रीत्यर्थ आमच्या मुख्य कार्यालयात द्यावीत अशी नम्र विनंती.

तुमच्या प्रतिक्रिया लवकरात लवकर आम्हाला जरूर कळवाव्यात.

धन्यवाद!

तुमचा प्रसाद कसबेकर

–संपर्क मो. :९८२०५ ०१५५१

## श्रद्धांजली

**कै. सावित्रीबाई (कावेरी नागेश नाडकर्णी, सावर पै)**

**३८ वे पुण्य स्मरण – निधन रविवार २८ जुलै १९८५**

तुझ्या प्रेमळ आठवणींशिवाय गेल्या ३८ वर्षात एकही दिवस गेला नाही. श्रीमंगेश तुझ्या आत्म्यास शांती देवो, तुझा आशीर्वाद आमच्या पाठीशी अखंड राहो. तुझ्या स्मृतीस सादर प्रणाम!

**कै. विनय (मोरेश्वर) नागेश नाडकर्णी** यांच्यातर्फे



### प्रकाशझोत

## कौतुक कुमारी आर्या वर्टीचे

पारले टिळक विद्यालयातून (इंग्रजी माध्यम) यंदाच्या १० वी च्या परिक्षेला बसून कुमारी आर्या रवींद्र वर्टी हिने ९७.८% गुण पटकावले.
ह्या बद्दल तिचे ***हार्दिक अभिनंदन!***

फक्त अभ्यासच नाही तर इतर कार्यक्रमामध्येही ती हिरीरीने भाग घेते व उत्तम गुण प्राप्त करते.

ड्रॉईंगच्या परिक्षेत तिने 'A' ग्रेड मिळवली तर भारतनाट्यम नृत्यामध्ये नालंदा इन्स्टिट्यूटमधूनही 'A' ग्रेड मिळवती झाली.

'ध्रुव' या आंतरशालेय संस्कृत नाटकामध्येही तिने उत्तम भूमिका निभावली.

तिला पुढील आयुष्यासाठी संघातर्फे ***शुभेच्छा!***

## ☺ ☺ ☺ विजूले चुटकुले ☺ ☺ ☺

**एक मनीस बिल्डराक विचारता कि, तुमी जाहीरात दिल्लो फ्लॅट स्टेशनाकडल्यान पाच ते दहा मिनीटार आसा मरे ? मागीर तुम्ही खोटी जाहिरात कित्याक करतात ? माका तर हांगा पावच्याक "अर्धो तास" लागलो मरे !**

**बिल्डर म्हणता, "तुमी चलून आयले की किते ?"**

**बायल म्हणता ," हे पळया आता आमगेले लग्न झाल्ले, आसा तेन्ना दुसऱ्या बायलां कडेन पळवचे बंद करात."**

**घोव म्हणता," अशे कशे म्हणता तू ? हांव जर डायटिंग करत आसा तर जेवणाचो मेन्यू पळवचोच ना कि किते ? "**

विजय वागळे मो. : ९२२१६०७५७७

## संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या (मागील अंकानंतर ) उल्लेखनीय देणग्या

**श्रीमती गंगाबाई व श्री. काशिनाथ त्रिंबक नाडकर्णी यांच्या ५० व्या पुण्यतिथीसमयी ५० हजार रुपयांची देणगी**

गोरेगाव येथे रहाणारे श्रीमती गंगाबाई व श्री. काशिनाथ त्रिंबक नाडकर्णी या उभयतांचे ५० वर्षांपूर्वी निधन झाले होते. त्यानिमित्त त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांच्या स्मरणार्थ संघाच्या समाजसेवा निधीसाठी ५० हजार रुपयांची देणगी दिली आहे.

**श्रीमती ऊर्मिला व श्री. मंगेश पु. नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ ५० हजार रुपयांची देणगी**

पूर्वी बोरिवली येथे वास्तव्यास असणारे श्रीमती उर्मिला व श्री. मंगेश पुरुषोत्तम नाडकर्णी यांचे उभयतांचे ४० वर्षांपूर्वी निधन झाले होते. त्यांच्या स्मरणार्थ त्यांचे सुपुत्र श्री. विनय यांनी वृद्धसेवानिधीसाठी ५० हजार रुपयांची देणगी दिली आहे.

**श्री. मधुकर व श्रीमती मालती कसबेकर यांच्या स्मृतीप्रतीत्यर्थ दोन लाख रुपयांची देणगी**

पूर्वी पार्ले येथे रहाणारे श्री. मधुकर शांताराम कसबेकर यांचे बऱ्याच वर्षांपूर्वी निधन झाले. त्यांच्या पत्नी श्रीमती मालती यांचे गेल्याच वर्षी निधन झाले. त्यांच्या कसबेकर कुटुंबीयांनी उभयतांच्या स्मृतीप्रीत्यर्थ २ लाख रुपयांची देणगी दिली आहे. यातील प्रत्येकी ५० हजार रुपये समाजसेवा निधी, वैद्यकीय साहाय्यनिधी, वृद्धसेवानिधी व एज्युकेशन सोसायटीसाठी आहेत.

**श्रीमती सुलभा गंडभीर यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी वृद्धसेवानिधीसाठी एक लाख रुपयांची देणगी**

पूर्वी हिंदु कॉलनी येथे रहाणाऱ्या श्रीमती सुलभा (भवानी) रघुनाथ गंडभीर यांचे हे जन्मशताब्दी वर्ष. या प्रसंगी त्यांची कन्या रश्मी शिवानंद कामत यांच्यातर्फे ५० हजार, सुमेधा दिलीप वागळे यांच्यातर्फे २५ हजार व पुत्र डॉ. अजित गंडभीर यांच्यातर्फे २५ हजार रुपये म्हणजे एकूण १ लाख रुपये देणगी मिळाली आहे.

**श्री विठ्ठल (बाळ) पालेकर यांच्या पहिल्या पुण्यतिथी प्रसंगी समाजसेवा निधीसाठी २५ लाख रुपयांची देणगी**

ज्ञातीचे एक हितचिंतक श्री. विठ्ठल (बाळ) शिवानंद पालेकर यांचे गेल्यावर्षी निधन झाले. याप्रसंगी मुखपत्रिकेत त्यांच्या कार्याचा गौरव दिला होता. ते विविध प्रसंगी संघाला भरघोस देणग्या देत असत. यंदा त्यांच्या पहिल्या पुण्यतिथीप्रसंगी त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती लता पालेकर व पुत्र जयेन व रोहन यांनी त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ २५ लाख रुपयांची देणगी दिली आहे. संघातर्फे ज्या लाभार्थींना दर महिना आर्थिक सहाय्य मिळते त्यात वाढ करणे आता सुलभ होणार आहे.



## संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीमती शांताबाई (चंपूताई) रमाकांत बोरकर यांच्या १४ व्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री. अजित यांजकडून | १,००१ |
| २) | श्री अरुण भास्कर कसबेकर यांजकडून त्यांच्या पुस्तक विक्रीतून आलेले | ४,८०० |
| ३) | श्रीमती गंगाबाई व श्री. काशीनाथ त्रिंबक नाडकर्णी यांच्या ५० व्या पुण्यतिथी निमित्त नाडकर्णी कुटुंबाकडून | ५०,००० |
| ४) | हितचिंतकांकडून | १२,००० |
| ५) | श्री. सच्चिदानंद नागेश नाडकर्णी यांच्या २७ व्या पुण्यतिथी निमित्त नाती सुदिप्ता व अनुष्का सुबोध नाडकर्णी यांजकडून | ५,००० |
| ६) | श्रीमती शरयू दत्तात्रय नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ हितचिंतकाकडून | १,००१ |
| ७) | डॉ. नलिनी महारुद्र नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ हितचिंतकाकडून | १,००१ |
| ८) | श्री. सदानंद गणपत नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ हितचिंतकाकडून | १,००१ |
| ९) | श्रीमती नीलम शांताराम कुलकर्णी यांच्या तिसऱ्या पुण्यतिथी निमित्त पती श्री. शांताराम (अरुण) यांजकडून | ५,००० |
| १०) | श्रीमती वृंदा व श्री. गजानन वासुदेव कसबेकर यांच्या स्मरणार्थ पुतण्या श्री. दिलीप आरस यांजकडून | १०,००० |
| ११) | श्री. विठ्ठल (बाळ) शिवानंद पालेकर यांच्या प्रथम पुण्यतिथीप्रसंगी पत्नी श्रीमती लता पालेकर व पुत्र जयेन व रोहन यांजकडून | २५,००,००० |
| १२) | श्री. मधुकर शांताराम कसबेकर व श्रीमती मालती यांच्या स्मरणार्थ कसबेकर कुटुंबीयांकडून | ५०,००० |
| १३) | श्री. देविदास विश्वंभर कसबेकर यांजकडून | २१,००० |

### वैद्यकीय साहाय्या प्रीत्यर्थ

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. गोविंद मारुती कसबेकर यांच्या १२ व्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री. विनय यांजकडून | ३,००० |
| २) | श्री. मधुकर शांताराम कसबेकर व श्रीमती मालती यांच्या स्मरणार्थ कसबेकर कुटुंबियांकडून | ५०,००० |

## वृद्ध सेवा निधीसाठी

| | |
|---|---|
| १) श्री. दिनकर दुर्गाराम कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती सुलभा यांजकडून | १,००१ |
| २) श्रीमती शांताबाई (चंपूताई) रमाकांत बोरकर यांच्या १४ व्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री. अजित यांजकडून | १,००१ |
| ३) श्रीमती उर्मिला व श्री. मंगेश पुरुषोत्तम नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. विजय यांजकडून | ५०,००० |
| ४) श्रीमती सुलभा रघुनाथ गंडभीर यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती सुमेधा दिलीप वागळे यांजकडून | २५,००० |
| ५) श्रीमती सुलभा रघुनाथ गंडभीर यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती रश्मी शिवानंद कामत यांजकडून | ५०,००० |
| ६) श्रीमती सुलभा रघुनाथ गंडभीर यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पुत्र डॉ. अजीत यांजकडून | २५,००० |
| ७) श्री मधुकर शांताराम कसबेकर व श्रीमती मालती यांच्या स्मरणार्थ कसबेकर कुटुंबीयांकडून | ५०,००० |

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

| | |
|---|---|
| १) श्री. दिनकर दुर्गाराम कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती सुलभा यांजकडून | १,००१ |
| २) श्रीमती शांताबाई (चंपूताई) रमाकांत बोरकर यांचया १४ व्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री. अजित यांजकडून | १,००१ |
| ३) श्री. माधव दत्तात्रय बोरकर यांच्या जन्मशताब्दी निमित्त बोरकर कुटुंबीयांकडून | २५,००० |
| ४) श्री. मधुकर शांताराम कसबेकर व श्रीमती मालती यांच्या स्मरणार्थ कसबेकर कुटुंबीयांकडून | ५०,००० |



## 'सर्वप्रथम सेवा' याची व्याप्ती

मुंबईमध्ये हजारो हौसिंग सोसायट्या, टॉवर्स, इंडस्ट्रीयल इस्टेटस् वगैरे आहेत. त्यांचे व्यवस्थापन म्हणजे एक डोकेदुखी व मनस्ताप असतो. भाडी गोळा करणे, बँकेत भरणा करणे, पाणी/वीज/प्रॉपर्टी टॅक्स यांची बिले भरणे, माळी, सुरक्षा, लिफ्टमन यांच्यावर देखरेख ठेवणे, दुरुस्ती देखभाल करणे, हिशेब ठेवणे अशी अनेक कामे असतात. कार्यकारिणीचे सभासद म्हणून कुणाला राहायचे नसते, जे मारून मुटकून सभासद होतात त्यांना वेळ नसतो. आम्ही ही सगळी ए टू झेड कामे करण्याची जबाबदारी घेतो. आमच्याजवळ सध्या अनेक संस्थांची कामे आहेत. त्यांत टाटा हाऊसिंग, लक्ष्मी इंडस्ट्रीयलसारख्या मातब्बर संस्था आहेत. त्याशिवाय लघु उद्योग सुरू करण्यासाठी आमच्याजवळ नोंदविलेले अनेक ट्रेड मार्क्स आहेत.

**उद्दिष्ट :** सेवा पुरविण्यासाठी आम्हाला मनुष्यबळाची आवश्यकता आहे. इच्छुक ज्ञाति बांधवानी आमच्याशी संपर्क साधावा. त्यांना अर्थार्जन करण्यासाठी आम्ही साहाय्य करू तसेच आमच्या ट्रेड मार्क्सच्याद्वारे व्यवसाय सुरू करण्यासाठी आम्ही मार्गदर्शन करू. ज्ञातिबांधवांची सेवा हेही आमचे उद्दिष्ट आहे.

**संपर्क : न. अ. जोशी : ९८१९३०४५९९/९९२०४०४५९९**

**पत्रव्यवहाराचा पत्ता :** पोस्ट बॉक्स ११९९०, आझादनगर पोस्ट ऑफीस,
अंधेरी (प.), मुंबई ४०० ०५३.

SERVICE FIRST®

98193 04599 — 99204 04599

SOCIETY SERVICE RESOURCE • समाजसेवा समृद्धि •

सर्वप्रथम सेवा®

SOCIETY SERVICE RESOURCE

## ।। कालाय तस्मै: नम: ।।

| | नाव | गाव | सध्याचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १) | मीरा मोहन फेणाणी | चेंडीये | वसई |
| २) | गुरुदास गणेश गुंजीकर | सुपे | पुणे |
| ३) | विनायक वामनराव इसलूर | सिरसी | जोगेश्वरी |
| ४) | अजय प्रशांतरंजन कसबेकर | कडवाड | पुणे |
| ५) | अनिल सुरेंद्र कुलकर्णी | हळगे | ठाणे |
| ६) | शकुंतला मंगेश कोपलकर | कुमठा | अंधेरी |
| ७) | कालिंदी सुरेश मुजुमदार | अंकोला | चर्चगेट |
| ८) | नलिनी महारुद्र नाडकर्णी | सावर पै | सांगली |
| ९) | प्रेमानंद शंकर नाडकर्णी | सावर पै | माहिम |
| १०) | सुरेश दुर्गाप्पा नाडकर्णी | मिर्जन | ठाणे |
| ११) | रमेश गोविंद पिंगे | सदाशिवगड | माहिम |
| १२) | कुमुद मोहन सोहोनी | गांवगेरी | पारले |
| १३) | प्रेमा शंकर तेलंग | केरवडी | केरवडी |
| १४) | नागेश मंगेश (गुणा) तेलंग | केरवडी | पारले |
| १५) | जयश्री सुरेश तेलंग | हारवडे | अमेरीका |
| १६) | इंदिरा कमलाकर वर्टी | सदाशिवगड | वांद्रे |
| १७) | प्रभा प्रभाकर वागळे | बाड | नाशिक |
| १८) | लता नारायण वागळे | माजाळी | डोंबिवली |

## ।। कालाय तस्मै नम:।।

मागील अंकात या सदरामध्ये काही नावांची माहिती अनावधानाने चुकीची दिली गेली. त्याची दुरुस्ती करून पुढे दिल्याप्रमाणे ती माहिती वाचावी. धन्यवाद!

| | नाव | गाव | ठिकाण |
|---|---|---|---|
| १) | विश्वेश्वर सदाशिव पिकळे | अंकोला | अंधेरी |
| २) | ताराबाई (सुंदऱ्या) भालचंद्र पालेकर | अर्गे | गिरगांव |
| ३) | गोविंद मर्तोबा तेलंग | केरवडी | माहिम |
| ४) | शैलजा शिवानंद तेलंग | नंदव्हाळ | पारले |
| ५) | सदाशिव (विजय) जिवाजी वागळे | बाड | पारले |
| ६) | अजित भवानीशंकर कसबेकर | कडवाड | पुणे |



Regd. with register of Newspapers of India under Reg. No. RN37436/80




हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक प्र. मो. कसबेकर यांनी दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.